'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, March 2022, Special Issue-V Volume-IV
*"Current Scenario in Languages, Social Sciences, and its Impact on Social Development"*

# आदिवासी लोकनृत्ये: आदिवासी लोकसंस्कृतीचा एक जिवंत आविष्कार
## (विशेष संदर्भ: ठाणे आणि पालघर जिल्हा)

**श्री. अशोक खंडू मोरमारे**
मराठी विभाग, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज,जि. कोल्हापूर.

**प्रास्ताविक :—**

महाराष्ट्रातील ठाणे आणि पालघर या जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने मल्हार कोळी, वारली, महादेव कोळी, ठाकर, कातकरी, कोकणा या आदिवासी जमातींचे वास्तव्य असलेले पाहावयास मिळते. या आदिवासी जमातींचे जीवन हे निसर्गनिर्भर आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहून ते आपली उपजीविका करत असतात. या आदिवासींचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. त्याचबरोबर जंगलामध्ये मिळणारा मध, डिंक, कंदमुळे, रान फुले, फळे, रानभाजी, विविध औषधी वनस्पती या सारख्या वस्तू गोळा करून ते आपली गुजरान करत असतात. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी ते दिवसभर भटकंती करत असतात. दिवसभराच्या भटकंतीने आणि कष्टाच्या कामामुळे आलेला शिणवटा घालविण्यासाठी हे आदिवासी समाज परंपरेने रूढ असणाऱ्या विविध लोककथा, लोकगीते, उखाणे, कोडी, लोकनृत्ये यासारख्या पारंपरिक मनोरंजनाच्या व करमणुकीच्या साधनांचा आपल्या जीवनामध्ये आनंद, उत्साह व नवचैतन्य आणण्यासाठी आधार घेत असतात. यांचे एखाद्या घटकाचे जरी सादरीकरण आदिवासींकडून झाले तरी आदिवासी त्यामध्ये मनसोक्तपणे सहभागी होतात व त्याचा आनंद लुटतात. त्यातल्या त्यात आदिवासींची लोकनृत्ये ही आदिवासी संस्कृतीचा अनमोल असा ठेवा आहे, असे म्हणता येते. महाराष्ट्रातील ठाणे, पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातींच्या लोकजीवनामध्ये तारपानाच, कामडी, घोरनाच(टिपरीनाच), गौरीनाच, तबलानाच, तूरनाच, धुमशानाच, मांदननाच अशी विविध प्रकारची लोकनृत्य रुजलेली आहेत. ही लोकनृत्ये धार्मिक सणांच्यावेळी, उत्सवावेळी, विविध विधीवेळी किंवा एखाद्या आनंदाच्याप्रसंगी आनंदोत्सव साजरा करताना सादर केली जातात. या नृत्यांमध्ये तारपा, ढोल, तबला, टिपरी, तूर, तांब्या, सणई अशा विविध पारंपरिक लोकवाद्यांचा वापर केला जातो. या वाद्यांना या आदिवासी जमातीचे लोक अधिक महत्व देतात. त्याचबरोबर त्यांना अधिक पवित्र मानतात. त्यामुळे ते या लोकवाद्यांना अधिक जपतात. ही लोकनृत्ये आदिवासींच्या जीवनामध्ये आनंद, उत्साह, नवचैतन्य, समूहभावना, एकसंघता निर्माण करतात. ही लोकनृत्ये या आदिवासींच्या आजूबाजूच्या वातावरणाच्या प्रभावातून निर्माण झालेली असतात. ती मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली असतात. यांचे जतन हे आदिवासी करतात.

एकूणच निसर्गाविषयी त्यांच्या मनात अपार असे प्रेम आहे. निसर्ग शक्तींना तो आपले दैवत मानतो. निसर्ग आपल्याला अनुकूल व्हावा म्हणून ते त्याची पूजा करतात. निसर्ग शक्तींना आपल्या जीवनात अढळ असे स्थान देऊन आनंदी जीवन जगण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. त्याच्यासाठी ते मनसोक्त गातात आणि नाचतात.

**लोकनृत्य म्हणजे काय ?**

डॉ. प्रभाकर मांडे लोकनृत्याविषयी सांगतात, ''कोणत्याही जीवन हेतू शिवाय केलेली अवयवांची लयबध्द हालचाल जिचा जन्म भावनावेगातून होतो व या हालचालीतून त्यांचाच आविष्कार होतो. अशा आविष्कारास नृत्य असे म्हणतात''.[१]

नृत्य करणे हा माणसाचा उपजत गुण आहे. एखादे वाद्य वाजले असता. किंवा एखादी व्यक्ती जेव्हा सुखाच्या अथवा दु:खाच्या प्रसंगी भावनिक होते, तेव्हा ती व्यक्ती अनपेक्षितपणे विशिष्ट प्रकारची हालचाल करते. या हालचालीबाबत ही व्यक्ती अनभिज्ञ असते. अशा स्वरुपाची हालचाल डॉ. प्रभाकर मांडे नृत्याच्यादृष्टीने विचारात घेतात.

र. वा. दिघे म्हणतात, ''नृत्य म्हणजे फुकट व सोपं असं मर्दन किंवा मालिश होय''.[२]

नृत्य ही सहजसाध्य कला आहे. लोकजीवनात नृत्याकडे केवळ एक मनोरंजनाचे साधन म्हणून पाहिले जाते.

डॉ. गोविंद गारे 'आदिवासी लोकनृत्य:लय, ताल आणि सूर' या ग्रंथाला दिलेल्या प्रस्तावनेत सांगतात, ''खरं म्हणजे नृत्य हे दृश्य काव्य. केवळ शब्दांनी त्याचे यथातथ्य दर्शन घडविता येत नाही, तर लयबध्द् शारीरिक हालचालीतून त्याचे दर्शन घडविता येते''[३]

याचा अर्थ नृत्य हे माणसाच्या भावभावनांना लयबद्धरित्या हालचालीतून व्यक्त करण्याचे एक उत्तम साधन आहे. असे म्हणता येते.

- **लोकनृत्यचा उगम :–**

लोकनृत्याच्या उगमासंबंधी सौ. सविता जाजोदिया म्हणतात,''माणूस प्राण्यांपासून विशेषत: मोरापासून नृत्य करण्यास शिकला. अशी भिल्लांची समजूत आहे. रूढ समज मात्र असा आहे, 'शिव' हा मूळ नृत्यगुरू होय. त्याच्यापासूनच नृत्यकला मानवामध्ये रूजली.''[४]

प्राचीन काळी आदिमानव समूहाने राहात होता. भावाभिव्यक्तीसाठी तो विशिष्ट शारीरिक हालचाल करायचा त्यातूनच आनंद, दु:ख इ. भावनावेग लयबध्द हालचालींतून व्यक्त झाले. या हालचालींना परंपरेने काही सूसूत्रता आली आणि त्यातून लोकनृत्ये जन्माला आली असावीत.

डॉ. गोविंद गारे म्हणतात, ''आदिवासी समाजाची अशी धारणा आहे, त्यांना ही सारी नृत्य त्यांच्या मोठ्या देवाने (बडादेवाने) दिली आहेत. शिकविली आहेत. आदिवासींच्या मौखिक वाङ्मयात त्याला अनेक आधार मिळतात. कांबडनाच नारनदेवाने कणसरी मातेला प्रसन्न करण्यासाठी केला. बड्यादेवाने 'राजनेगी बाना बनवून वाद्ये वाजविण्याची कला परधानांना स्वप्नात सांगितली. भिवसन देवाने दंडार सुरू केला.''[५]

एकूणच आदिवासी नृत्ये ही देवदैवतांच्या जवळ पोहोचण्यासाठी आणि आलेला दिवस आनदाने घालविण्यासाठी आदिवासी लोकजीवनामध्ये प्रचलित झाली आहेत, असे म्हणता येते.

**आदिवासी लोकनृत्यांचे स्वरूप :**

आदिवासी संस्कृतीत लोकनृत्ये ही आदिम काळापासून रूजलेली आहेत. नृत्य आणि संगिताच्या तालावर आपल्या जीवनात आनंद भरीत राहण्याचा मार्ग आदिवासींना त्यांच्या संस्कृतीने दिला आहे. आदिवासींचे जीवन हे कष्टमय आहे. दोन वेळच्या जेवणासाठी त्यांना राबराब राबावे लागते. असे असतानाही या यातनांना न घाबरता पुढे चालताना ते दिसतात. यातही ते आनंदी जीवन जगताना दिसतात. हा आनंद आदिवासी समाजाला त्यांच्या लोकजीवनात प्रचलित असलेली विविध लोकनृत्ये मिळवून देतात.

आदिवासीची लोकनृत्ये ही स्वयंस्फूर्त आहेत. त्यामध्ये नैसर्गिकता जपलेली असते. नृत्य आदिवासींच्या समाज जीवनाचे अविभाज्य अंग आहे. लोकनृत्याच्या माध्यमातून आनंद, उत्साह, जोमदारपणा, ताल, लय आणि सूर यांचा सुरेख संगम साधलेला असतो. त्यांचे अनेक जीवनानुभव, सामाजिक संकल्पना, भौगोलिक वातावरणाचे संदर्भ त्यांच्या नृत्य संगीतातून प्रकट होत असतात.

डॉ. गोविंद गारे म्हणतात, ''आदिवासींची लोकनत्ये ही निसर्गाच्या सानिध्यात व निसर्गाशी एकरूप होण्यासाठी निर्माण झालेली दिसतात. शिकार करताना जो जो हावभाव त्यांच्याकडून होतो. त्याचाच आविष्कार नृत्यातून साकारला जातो. विजयाच्या आनंदात शौर्याच्या आविष्काराचे प्रकटीकरण त्यातून साकारले जाते. यातून वाघ, सिंह, डुक्कर इ. संबंधीची भितीयुक्त भावना प्रकट केली जाते. व्याघ्र नृत्याची निर्मिती याच आविष्कारातून झाली असावी.''[६]

आदिवासी समाज हा कष्टकरी समाज आहे. दिवसभर जंगलात भटकंती करून आल्यानंतर अथवा शेतामध्ये कष्टाची कामे केली असता कामाच्या शिणवटा घालवण्यासाठी किंवा आपल्या समाजात पूर्वापार परंपरेनुसार रूजलेले विविध विधी, सण, उत्सव, साजरे करताना आदिवासी नृत्ये सादर करतात. यातूनच आनंद व नवचैतन्य अनुभवण्यास मिळते. ही नृत्ये प्राण्यांचे मुखवटे घालून सादर केली जातात.

आदिवासींची काही नृत्ये ही शौर्यात्मक व लढाऊ वृत्तीचे दर्शन घडविणारी असतात. एका टोळीची दुसऱ्या टोळीशी नेहमी भांडणे होत असतात. त्यामुळे लढाऊ वृत्तीची जोपासना आदिवासींमध्ये आपसूकच



Principal
Shivaji College of Arts, Commerce &
N.D.T. Kahale Science College

होत जाते. या लढाऊ वृत्तीचे नृत्याच्या माध्यमातून प्रकटीकरण आदिवासींकडून होताना दिसते. या प्रकारची नृत्ये भारताच्या पूर्व भागातील आदिवासी जमातीमध्ये प्रचलित आहेत.

आदिवासींची नृत्ये ही आदिवासींच्या धार्मिक सणांशी, विधींशी, सण–उत्सवाशी आणि समाजिक प्रथांशी संबंधित असतात. महाराष्ट्रातील आदिवासी शेतात पिके डोलू लागली की सुगीच्या कामा आनंदाच्या आवेगात नाचतात सुगीच्या प्रसंगी वारली, कोळी मल्हार, ठाकर, कातकरी, कोकणा, कोळी महादेव वगैरे आदिवासी जमाती आपापल्या समाजात रूढ असलेली नृत्ये, आनंदाने सादर करतात. त्यामध्ये तन, मन, धन ओतून बेधूंदपणे नाचतात. "वारली भाद्रपद वद्य द्वादशीला गावदेवीच्या मंदिराजवळ नृत्याला सुरूवात करतात या तिथीला ते 'पित्तबारस' म्हणतात."[७] यावेळी आजूबाजूच्या परिसरातील वारली जमातीचे आदिवासी बांधव एकत्र येतात आणि 'तारपा' नृत्य सादर करतात. वारली जमातीचे आदिवासीही तारपा नृत्यावर आनंदाने नाचतात. त्याचबरोबर कांबडनाच, गौरी नाच, टिपरी नाच, धूमशा नाच, बोहडा नाच, मांदन नाच, तबला नाच ही नृत्ये देखील या विविध आदिवासी जमातीमध्ये अधिक रूजलेली आहेत. या नृत्यांत हे आदिवासी गाणी देखील गातात.

डॉ. गोविंद गारे म्हणतात, 'लोकनृत्य हे आदिवासी जीवनाचे खरे व जिवंत अंग आहे. त्यात आनंद चैतन्य, ताल, लय सारे काही आहे. निसर्गाचे भव्य दिव्य उदात्त, करूणामय असे रूप पाहून त्यांच्या भावना आर्त बनतात. साऱ्या संकटांना हसत, खेळत, नाचत सामोरे जाण्याचे धैर्य अन् कसब लोकनृत्यांनी त्यांच्यात निर्माण केले आहे.'[८]

लोकनृत्ये या आदिवासींच्या लोकजीवनाला व्यक्त करत असतात. त्यातून त्यांच्या जीवनातील सुखाचे, दुख:चे आनंदाचे, संस्कृतीचे, त्यांच्या दररोजच्या जगण्याचे, त्यांच्या अजूबाजूच्या परिसराचे, निसर्गाचे, निसर्गातील विविध शक्तीचे, लोकजीवचनात प्रचलित असणाऱ्या विविध लोकदेवतांचे व त्यांच्या उपासना पद्धतीचे व त्यांच्या भावभावनांचे प्रकटीकरण होत असते. यातून आदिवासी लोकनृत्याचे स्वरूप स्पष्ट होत जाते.

### आदिवासींची प्रचलित लोकनृत्ये

ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील आदिवासी जमातींमध्ये विविध प्रकारची लोकनृत्ये परंपरेने रूढ असलेली पाहावयास मिळतात. ही लोकनृत्ये मौखिक परंपरेने रुजलेली दिसतात. ही या आदिवासी जमातींच्या लोकजीवनामध्ये अधिक आनंद भरतात. त्यांच्यामध्ये कमालीचा उत्साह निर्माण करतात. यामुळेच या लोकनृत्यांना आदिवासी लोकजीवनामध्ये अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. ही लोकनृत्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**'तारपा'** नृत्य हे कोळी मल्हार व वारली आदिवासी जमातींच्या लोकजीवनामध्ये अधिक रुजलेले पाहावयास मिळते. हे नृत्य आनंदोत्सव साजरा करावयाचे नृत्य आहे. जेव्हा हे आदिवासी शेतीच्या सर्व कामामधून रिकामे होतात तेव्हा ते आनंदाने हे नृत्य सादर करतात. भात हे या जमातींचे मुख्य पीक आहे याची रोपे तयार करून ती भात खाचरामध्ये पुन्हा लावावी लागतात. त्यास 'आवणी'असे म्हणतात. ही आवणी करणे हे या जमातींचे अतिशय महत्वाचे काम आहे. या आवणीच्या कामामध्ये कोणीही मागे राहता कामा नये. कारण आवणी झाल्याशिवाय तारपा वाजविला जात नाही. तारपा पाड्यात वाजला म्हणजे सर्व आदिवासी पाडा आपल्या कामातून रिकामा झाला आहे, असे समजले जाते. सुगीची कामे संपल्यानंतर म्हणजेच दिवाळीमध्ये तारपा वाजविला जातो. तारपा केवळ आनंदोत्सव साजरा करण्यासाठी वाजविला जातो. या तारप्याच्या धुनीवर हे आदिवासी बेधुदपणे नाचताना दिसतात. तारपा नृत्य कोणत्याही यातूविधींशी निगडित नाही. तारपा हे पुंगीसारखे वाद्य आहे. हे वाद्य दुधी भोपळा, दोन लहान बांबू, ताडाची पाने यांच्यापासून बनविलेले असते. विशिष्ट स्वर बाहेर पडण्यासाठी बांबूला पाच छिद्रे बासरीसारखी पाडलेली असतात. त्यामध्ये एक मोठे छिद्र असते. त्याला मेणाने बंद केलेले असते. यावर हिरवा चिन्ह व कुलदैवताचे प्रतीक म्हणून मोराचे पंख बांधलेले असतात. पूर्वापार परंपरेनुसार हा तारपा वाजविला जातो वाडवडिलांपासूनच ही तारपा वाजविण्याची परंपरा चालत आलेली असते. हा तारपा जसा आनंदोत्सवासाठी

वाजविला जातो तसाच तो रवालामध्ये (भक्तांच्या अंगात देव खेळविण्याचा विधी) केवळ एक धून म्हणून वाजविला जातो. तारप्याबरोबर एक घोलकाठी असते. या घोलकाठीच्या वरच्या बाजूला घुंगूर अथवा पत्र्याचे लहान तुकडे बांधलेले असतात. या नाचामध्ये एकाआडएक स्त्री आणि पुरूष असे २० ते २५ आदिवासी कलाकार असतात. या कलाकारांच्या पुढे असणाऱ्या म्होरक्या कलाकाराकडे ही घोलकाठी असते. या घोलकाठीला तो विशिष्ट लयीमध्ये जमिनीवर आपटतो. यामुळे या काठीतून लयबध्द असा आवाज बाहेर पडतो. या काठीच्या आवाजावर व तारप्याच्या धुनीवर हे आदिवासी बेधुंदपणे लयबध्दरित्या रात्रभर नाचत राहतात. हा तारपा पुंगीसारखा वाजविला जातो. हा तारपा वाजविताना या कलाकाराला श्वास कोंडून ठेवावा लागतो. म्हणजेच हवा तोंडात साठवून ठेवून ती एकसारखी तारप्यामध्ये सोडावी लागते. तारप्यासाठी असा दम साठवून ठेवावा लागत असल्यामुळे तारपा वादकाला छातीचे आजार जडतात. हवा तोंडात साठवून ठेवल्यामुळे तारपा वादकाच्या दातावर हवेचा दाब येतो. त्यामुळे तारपा वाजविणाऱ्या कलाकाराचे पटाशीचे दात पडलेले असतात. तसेच त्याच्या डोक्यालाही त्याचा त्रास होतो. असा त्रास होत असतानाही हे आदिवासी कलाकार याची कधीच काळजी करताना दिसत नाहीत. उलट तारपा नृत्या मध्ये तन, मन, धन एक करून जीवनातील सर्व दु:खे विसरून बेधुंदपणे नाचताना पाहावयास मिळतात. [९]

**'कामड'** नृत्य हे कोळी मल्हार आणि वारली या आदिवासी जमातींचे एक प्रमुख नृत्य म्हणून प्रचलित आहे. हे नृत्य पाऊस पडावा म्हणून केले जाते. हे नृत्य केल्यानंतर थोडातरी पाऊस पडतोच, असा या आदिवासी जमातीतील लोकांचा दृढ विश्वस आहे. या नृत्यातून नारनदेवाची आळवणी केली जाते. या नृत्यामध्ये पुरूष नाचतात आणि गाणी (लोकगीते) म्हणतात. स्त्रिया पाठी मागे त्यांना लोकगीते म्हणण्यासाठी साथ देतात. या नृत्यामध्ये वाद्य म्हणून एक पितळाचा लोटा घेऊन त्यावर लोखंडी खिळ्याने एक सूरात वाजविले जाते. या नृत्यामध्ये सात ते आठ पुरूष सहभागी असतात. त्यामध्ये एक सोंगाडया असतो. तो मध्ये मध्ये विनोद निर्मिती करण्याचं काम करत असतो. या विनोद निर्मितीसाठी तो अश्लिल शब्दांचाही सर्रास वापर करत असतो. तसेच लैंगिक हावभाव करणे किंवा स्वत:ला माकडासारखी शेपटी लावणे. अशा विविध कृतीतून गमती जमती करत बघ्यांचें मनोरंजन करत असतो. सोंगाड्याच्या या गमती जमती झाल्या की पुन्हा हे आदिवासी कलाकार गाणी म्हणत फेरी धरून विशिष्ट लयीत नृत्य करीत राहतात. या नृत्यामध्ये पुढीलप्रमाणे लोकगीत गायले जाते.

नाचू कुठं नाचू कुठं रं... धनतरीचे पाठीवर, .
धनतरी माझी माऊ रं...तिला मी पाय कसा लावू रं,
सूर्या समुख रेणूर उभा... सूर्या नमस्कारू रं, सूर्या नमस्कारू रं.
जिवल्या समूख रेणूर उभा...सूर्या नमस्कारू रं,
बरणा बराच बीस वर्षा रं...पावशादादा पलून गेलारं,
कणसरी माता कोमून गेली रं, कणसरी माता कोमून गेली .

सोंगाडयाचे आगमन –

संवाद : पावशादादा पलून गेला आहे रं. आता काय करायचं रं.?
सोंगाडया : (संवादात अश्लिलता येते) भोकात पाणी गेलं. पाणी नसलं, तरी चो....पाणी आहेना!

अशा संवादानंतर पुढे लोकगीत पुन्हा सुरू होते.

गावतरी माता हटून गेली रं, गावतरी माता हटून गेली रं.
साले थुया, थुया पाऊस पडं रं...साले नागलेच्या रोप्यावर,
साले झिम, झिम पाऊस पडं रं...साले वरयच्या रोप्यावर, [१०]

अशा स्वरूपाचे लोकगीत गाऊन त्यावर लयबध्द असा नृत्याविष्कार या आदिवासी जमातीकडून घडत असतो.

हे नृत्य करण्यासाठी यातील कलाकार या टिपऱ्या विशिष्ट लयीमध्ये एकामेकांच्या टिपऱ्यावर मारतात. त्यातून तालबध्द असा आवाज बाहेर पडतो. हे नृत्य करण्यासाठी हे कलाकार दिवाळीच्या पहिल्या दिवसापासून गावोगावी वर्तुळाकार फिरतात आणि बलिप्रतिपदेच्या दिवशी हे सर्व कलाकार आपल्या गावी शेवटी परत येऊन बळीराजाची पूजा करून हे नृत्य थांबवितात. या नृत्यापध्ये वापरलेला साजशृंगार व टिपऱ्या यांचे पूजन करून त्याला कोंबड्याचा बळी देऊन त्यांचे वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन केले जाते. या नृत्यामध्ये नमनाचे लोकगीत गायले जाते. पुढील प्रमाणे लोकगीत गायले जाते.

प्रथम नमितो नमन देवाचे जाण रे
अरे, केशर कस्तुरी ललाटी रे
हाती मोदकाची वाटी रे
पायी घुंगुर बांधुनी, नाचू आले गणपती रे [१३]

असे गणपती देवाला वंदन करुन टिपरी नाचास सुरुवात केली जाते. या नाचामध्ये वेगाला फार महत्त्व दिले जाते. या नाचामध्ये सूर, ताल आणि लय यांचा सुंदर मिलाफ घडवून आणलेला असतो. हे नृत्य पाहताना बघ्यांच्या डोळ्यांचे अक्षरश: पारणे फिटते.

**'तबला'** नृत्य हे कोळी मल्हार आदिवासी जमातीमध्ये प्रचलित असलेले आणखी एक नृत्य होय. हे नृत्य केवळ मनोरंजनासाठी केले जाते. हे नृत्य नागपंचमीपासून ते गौरीपर्यंत केले जाते. या नृत्यामध्ये पायाला घुंगूर बांधले जाते. त्यास 'घागऱ्या' असे म्हणतात. यामध्ये एक शिट्टीवाला असतो. तो या टोळीचा प्रमुख असतो. त्याला 'बुवा' असे म्हणतात. दोघे तबला वादक असतात. या तबल्याला 'तिडबिडया' असे म्हणतात. याचा आकार तबल्यासारखा असतो. यावरूनच त्याला 'तबला' नृत्य असे नाव पडले आहे. या नृत्यामध्ये आठ जोड्या असतात. हे नृत्य कोणत्याही विधीशी निगडित नाही. केवळ एक मनोरंजन म्हणूनच या नृत्याकडे पाहिले जाते. परंपरेनुसार हे नृत्य केले जाते. या नृत्यामध्ये हे आदिवासी या तबल्याच्या तालावर लयबद्धरित्या नाचताना दिसतात. या नृत्यामध्ये स्पर्धा खेळली जाते. विविध प्रश्नांच्या माध्यमातून एकमेकांच्या ज्ञानाची पारख या नृत्यातून केली जाते. या नृत्यामध्ये विविध लाकगीते म्हटली जातात. त्याचबरोबर या नृत्यामध्ये शेरही म्हटले जातात. म्हणजेच सवाल जवाब एकमेकांना विचारले जातात. वेगवेगळ्या प्रकारचे डाव–प्रतिडाव टाकले जातात. या नृत्यामध्ये प्रथम वंदनगीत म्हटले जाते. ते पुढील प्रमाणे असते.

ए हनुमंता, रामाच्या दूता,
चरणी तुझ्या वंदना.
हे प्रभू, धावूनी ये रंगना....
बोल, बोल तब्बल वाले की जय !!

यानंतर लोकगीत गायले जाते. ते पुढील प्रमाणे

बिरसा मुंडा आहे रे मोठ्या मनाचा ,
आदिवासी मानव आहे रे पहिल्या कालाचा.
अरे, आले रे आले तबलावाले, आले आले रे तबलावाले.
अरे, नाही कुणाची भीती आम्हाला,
जंगलचा राजा म्हणतात याला.
अरे, जंगल पहिलाच आहे आपल्या हक्काचा,
आदिवासी मानव आहे रे पहिल्या कालाचा.[१४]

**'बोहाडा'** हे कोळी महादेव, कोकणा व मल्हार कोळी आदिवासी जमातीमध्ये प्रचलित असलेले नृत्य आहे. यास 'भवाडा' असेही म्हणतात. विविध देवतांचे सोंग मुखवटे परिधान करून नृत्य केले जाते. यामध्ये देवतांना व पूर्वजनांना आळवून दुष्काळ व रोगराई नष्ट करणे हा विचार रूजलेला आहे. या नृत्यातून

**'गौरी'** नृत्य कोळी मल्हार आदिवासी जमातीचे एक प्रमुख नृत्य म्हणून प्रचलित आहे. या आदिवासी जमातीचा गौरी हा प्रमुख सण आहे. या सणाला या आदिवासी जमातीमध्ये फार महत्त्व असलेले पाहावयास मिळते. या सणाच्यावेळी जे नृत्य हे आदिवासी करतात, त्या नृत्याला 'गौरीनृत्य' असे म्हणतात. या नृत्यामध्ये आदिवासी स्त्री--पुरूष वर्तुळाकार फेरी धरून गौरीची गाणी म्हणत एका लयीत नृत्य करत असतात. या नृत्यामध्ये एक ढोलकी वाजविणारा असतो. त्याच्याभोवती ढोलकीच्या तालावर सर्वजण नाचत असतात. यावेळी ते गौरीची विविध गीते गातात. ही गाणी पुढीलप्रमाणे असतात. यामध्ये प्रथम नमनाचे लोकगीत म्हटले जाते.

पहिले नमीन नमू कोणला
पहिले नमीन चंदर, सूर्याला
दुसरे नमीन नमू कोणला
दुसरे नमन धनतरी मातेला [११]

असे नमनाचे लोकगीत झाल्यानंतर हे आदिवासी गौरीची लोकगीते म्हणत त्यावर लयबद्ध असा नाच करतात.

लाल लाल लुगडयाची गं गौराय गगणेची कोल्याची गं,
पट्टी नी जोडया देगं तू आई, आवड मला मोठी गं
लाल लाल लुगडयाची गं गौराय गगणेची कोल्याची गं.
मुरीचं पैंजण घेरं तू बापा, आवड मला मोठी गं,
लाल लाल लुगडयाची गं गौराय गगणेची कोल्याची गं.
सोन्याची चैन घेगं तू आई, आवड मला मोठी गं ,
लाल लाल लुगडयाची गं गौराय गगणेची कोल्याची गं.
कमरेची साडी घेगं तू आई, आवड मला मोठी गं.
लाल लाल लुगडयाची गं गौराय गगणेची कोल्याची गं. [१२]

अशा प्रकारची विविध लोकगीते गाऊन हे आदिवासी रात्रभर एका विशिष्ट लयीत नृत्य करत असतात. हे नृत्य करताना प्रत्येक कलाकाराने आपल्या एका पायामध्ये घुंगूर बांधलेले असतात. यामध्ये स्त्री--पुरूष एकत्र येऊन मनमुरादपणे नृत्य करत असतात. यामध्ये एक पुरुष नृत्याची लय बदलत असतो त्यास 'नाच्या' असे म्हणतात. हा नाच्या गाणीही म्हणत असतो. या लोकगीतांमध्ये गौरीच्या लोकगीतांबरोबरच मनोरंजनपर लोकगीते अधिक गायली जात असतात. यासाठी एकमेकांची मिश्किल थट्टा करणारी लोकगीते गायली जात असतात.

**'टिपरी'** नृत्य हे कोळी मल्हार आदिवासी जमातीमध्ये अधिक प्रचलित आहे. हे नृत्य टिपऱ्यांच्या साहाय्याने केले जाते. यामुळेच या नृत्याला 'टिपरी' नृत्य असे म्हणतात. तसेच याला 'घोर' नृत्य असेही म्हणतात. या नृत्यासाठी कुडा या वनस्पतीपासून टिपरी बनविली जातात. कारण या वनस्पतीपासून बनविलेल्या टिपऱ्यांचा चांगला आवाज येतो. तसेच त्यावर चांगले नक्षीकामही करता येते. हे नृत्य करणाऱ्या तरूणांच्या आठ जोड्या असतात. त्यांनी डोक्याला फेटे बांधलेले असतात. गळ्यामध्ये फुले घालून शृंगार केलेला असतो. तसेच या सर्व कलाकारांनी धोतराची पचांग बांधलेली असते. (धोतराला मानेत अडकवून छातीवरून उजवी बाजू डाव्या बाजूने व डावी बाजू उजव्या बाजूने पाठीमागे कमरेवर घेऊन धोतराच्या दोन्ही बाजूंची गाठ मारली जाते, यास पचांग असे म्हणतात.) तसेच कमरेला धोतर नेसून घुंगरांचा पट्टा बांधलेला असतो. या नृत्यामध्ये स्त्रियांचा सहभाग नसतो. हे नृत्य गावोगावी जाऊन केले जाते. यासाठी या नृत्याची मागणी करावी लागते. तेव्हा आम्ही अमक्या अमक्या गावात टिपरी नृत्य करण्यासाठी येत आहोत. अशी मागणी केली जाते. त्यानुसार हे कलाकार मागणी केलेल्या गावात टिपरी नृत्याचा कार्यक्रम करतात. गावकरी या कलाकारांच्या जेवणाची सोय करतात.

आदिवासी देवदेवतांचे दर्शन घडविले जाते. हे नृत्य विविध आदिवासी यात्रांमधून सादर केले जाते. हे नृत्य सादर करताना लोकगीतांच्या तालावर मुखवटे घातलेले कलाकार लयबध्दरित्या नाचत असतात. या नृत्यामध्ये शक्यतो रावणाच्या दहा शीरांचा मुखवटा नाचवला जातो. राववणाचा मुखवटा घालून नाचणे फार जोखमीचे काम असते. कारण हा मुखवटा भारी वजनाचा असतो. त्याचा तोल सांभाळून कलाकाराला नृत्य करावे लागत असते.या लोकगीताच्या तालावर मुखवटाधारक कलाकार लयबध्द नृत्य करत असतो. या रावणरूपी मुखवटाधारक कलाकाराबरोबर आणखी इतर देवतांचे मुखवटे परिधान करून कलाकार लयबध्द नृत्य करत असतात. हे लोकगीत गाणारा कलाकार स्वतंत्र गायक कलाकार असतो. तसेच त्याला साथ करणारा ढोलकीट्ट असतो. ते लोकगीत पुढीलप्रमाणे आहे.

भक्त होता महादेवाचा मोठ्या मनाचा,
रावण गुणाचा, माझा आदिवासी राजा रावण गुणाचा.
कैकयीच्या सीमाचा निद्रावाच्या चालीचा,
होता गवूच्या मातीचा, मडवी आडनावाचा.
बिभिषण आणि कुंभकर्ण भाऊ सुरूपनखाचा.. [१५]

अशा स्वरूपाच्या लोकगीतातून बोहडा नृत्य आदिवासी कलाकार सादर करत असतात.

**'ढोलनाच'** ठाकूर आदिवासी जमातीच्या लोकजीवनामध्ये प्रचलित आहे. हा नाच पितराच्यावेळी केला जातो. या नाचामध्ये ८ ते १६ कलाकार सहभागी झालेले असतात. या नाचामध्ये स्त्रिया सहभागी होत नाहीत. या नाचामध्ये एक ढोल आणि पत्र्याच्या डब्याचा ताशासारखा वापर केलेला असतो. प्रत्येक कलाकाराच्या एक पायात चाळ बांधलेले असतात. या ढोल आणि ताशाच्या तालावर नाचता नाचता हे कलाकार विविध प्रकारच्या कसरती करुन बघ्यांचे मनोरंजन करीत असतात. त्यामध्ये डोक्यावर उभे राहणे, हातावर चालणे, उलट्या उड्या मारणे, एकमेकांच्या डोक्यावर उभे राहणे, खांबावर उलटे उभे राहणे अशा विविध प्रकारच्या कसरती करत असतात. या कसरती करताना हे कलाकार एक कसरत केली की ढोलाजवळ येऊन नाच करतात. त्यानंतर पुन्हा दुसरी कसरत करण्यासाठी तयार होतात. या कसरती करणे फार अवघड असते. पण या आदिवासींनी या कसरतींचा अधिकाधिक सराव करुन त्या सोप्या केल्या आहेत.ठाकूर आदिवासी ह्या सर्व कसरती अगदी सहज करताना दिसतात. ते यानाचामध्ये गाणीही म्हणतात. ही गाणी बऱ्याचदा ढोलवाला गात असतो. हे गाणे पुढीलप्रमाणे असते.

माजा नमीन रं धरतरी मातंला । माजा नमीन रं कनसरी मातंला
माजा नमीन रं पानया देवाला । माजा नमीन रं ईज का गाजला
माजा नमीन रं मारवती देवाला । माजा नमीन रं गावका देवाला
माजा नमीन रं गावका गुजीला । माजा नमीन रं बसते सबंला
माजा नमीन रं माय बयनीला [१६]

एकूणच आदिवासी लोकजीवनामध्ये रुजलेली लोकनृत्ये स्त्री आणि पुरूष या दोघांच्या सहभागातून साकार झालेली दिसतात. काही नृत्ये केवळ पुरूषांसाठी आहेत. काही केवळ स्त्रियांसाठी आहेत. काही नृत्यात पुरूष वाद्य वाजवितात आणि स्त्रिया नाचतात तर काही नृत्यात स्त्रिया आणि पुरुष एकत्र नाचतात.

या नृत्यांमध्ये अनेकदा लोकगीतांचाही समावेश केला जातो. ही लोकगीते आदिवासींमध्ये मौखिक परंपरेने म्हणजेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केवळ ऐकून आणि लक्षात ठेवून आलेली असतात. मोठ्या गायकांनी गायलेली लोकगीते लहान मुले ऐकतात आणि पुन्हा ते म्हणतात. यातूनच लोकगीते पुढच्या पिढीकडे सरकत जातात व लोकनृत्य जपली जातात. असे म्हणता येते.

या लोकनृत्यांमधून स्त्रीपुरुष समानता, समूहभावना, एकसंघता, स्त्रीस्वातंत्र्य या मानवी जीवनमूल्यांची अधिक जपणूक केलेली दिसते. त्याचबरोबर आदिवासींच्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक जाणिवांचे दर्शन या लोकनृत्यातून अधिक घडत जाते.

**आदिवासी लोकनृत्यांची व्याप्ती :—**

आदिवासींचे जीवन हे निसर्गनिर्भर आहे. तितकेच ते कष्टमय व खडतर आहे. नागर समाजासारखे ते सुखासिन व आरामदायी तर नक्कीच नाही. आदिवासींच्या या कष्टमय व खडतर जीवनामध्ये लोकनृत्ये आनंदाचे, चैतन्याचे, मित्रत्वाचे, सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण करतात. त्यामुळे उद्याच्या जीवनाकडे ते नव्या उमेदीने व उत्कंठेने पाहतात. जगण्यातील सार्थक आदिवासींनी या लोकनृत्यातून शोधले आहे असे म्हणता येते.

आदिवासी लोकनृत्यात स्त्री पुरूष समानतेचे मूल्य आदिवासी समाजामध्ये पूर्वापार परंपरेपासूनच रूजले आहे. आदिवासी समाज समूहाने लोकनृत्य सादर करतात. त्यामुळे समूहभावना, स्त्री–पुरूष समानता, स्त्री स्वातंत्र्य, एकनिष्ठता यासारख्या जीवनमूल्यांची जपणूक आदिवासी लोकनृत्यातून होताना दिसते. त्यामुळे जागतिक शांतता, सद्भावना, एकनिष्ठता व साम्यवादाच्या दृष्टिकोनातून आदिवासी लोकनृत्यांना विचारात घेता येते. यातून आदिवासी लोकनृत्याची व्याप्ती अधिकच वाढत जाते.

जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची दृष्टी या लोकनृत्यातून आदिवासींना मिळते. हा विचार इतर समाजातील लोकांसाठी एक नवी जाणीव घेऊन पुढे येतो. त्यामुळे आदिवासी लोकनृत्ये ही केवळ आदिवासी समाजाच्या आनंदासाठी मर्यादित राहात नाहीत, तर ती इतर समाजासाठीही एक उर्जा ठरतात.

आदिवासी लोकनृत्यांमधून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडते. आदिवासींच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक जाणिवा लोकनृत्यातून जगासमोर येऊ लागल्याने आदिवासीकडे इतरांची पाहण्याची दृष्टी नक्कीच बदलली आहे, असे म्हणता येते.

आदिवासी लोकनृत्ये आदिवासी संस्कृतीचा एक उत्तम असा ठेवा आहे. तो जपला जावा या दृष्टीने अधिक प्रयत्न केले जात आहेत. आदिवासींची ही लोकनृत्ये आता केवळ आदिवासी समाजासाठी मर्यादित राहिली नसून ती इतर समाजातही रूजलेली पाहावयास मिळतात. आज आदिवासी नृत्ये ही विविध विधी, सण, उत्सव या सांस्कृतिक घटकांशी मर्यादित राहिली नसून करमणूक व संस्कृती दर्शनाच्या नावाखाली स्वतंत्र व्यासपीठावर सादर होऊ लागली आहेत.

अलिकडे आदिवासी कलाकारांनी विविध सांस्कृतिक कलापथके स्थापन करून आदिवासी लोकनृत्याला जंगलातील मंद दिव्यांच्या मंद प्रकाशातून बाजूला काढून शहरातील विजेच्या झगमगटात आणले आहे. आज विविध महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात, युवा महोत्सवात, राष्ट्रीय, राज्य पातळीवरील चर्चासत्रे, अधिवेशनात, साहित्य समेलनात आदिवासी लोकनृत्याचे सादरीकरण होताना पाहावयास मिळते. याचा अर्थ आदिवासी लोकनृत्ये आज जंगलातून बाहेर येऊ लागले आहे. म्हणजेच ते अधिक विस्तृत व व्यापक होत आहे, असे म्हणता येते.

**समारोप**

आदिवासी जमातींच्या लोकजीवनामध्ये लेकनृत्यांना अधिक महत्त्व आहे. ही लोकनृत्ये मौखिक परंपरेने रुजलेली आहेत. पारंपरिकता हा प्रमुख विशेष या लोकनृत्यात अधिक जपला गेला आहे. आदिवासी लोकनृत्यातून जीवनानुभव व्यक्त होत जातो. आदिवासी लोकनृत्यातून करमणूक करणे हा मुख्य विचार पुढे येतो. ही लोकनृत्ये आदिवासींच्या जीवनात आनंद निर्माण करतात. ही लोकनृत्ये जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास भाग पाडतात. आदिवासी लोकनृत्यांतून नैसर्गिकता अधिक जपली जाते. आदिवासींच्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक जाणिवांचे दर्शन या लोकनृत्यातून अधिक घडत जाते. आधुनिक वाद्य उपलब्ध असतानाही पारंपरिक वाद्य वाजवून आदिवासी कलाकार लोकनृत्ये सादर करतात. याचा अर्थ आदिवासी लोकनृत्यात आदिमता अधिक जपली जाते. ही लोकनृत्ये सादर करताना लोगीतांचाही वापर केला जातो. काही सवांदाचा वापर होताना दिसतो. यातून या आदिवासी जमातींच्या लोकभाषेचा वापर अधिक होताना दिसते. ग्रामीण भागातील रांगडेपण व कोकणी बाज या लोकभाषेतून व्यक्त होत जातो. या आदिवासींची लोकनृत्यात स्त्री–पुरूष समानता, समूहभावना, स्त्री स्वातंत्र्य एकनिष्ठता या मानवी जीवनमूल्यांची अधिकाधिक जोपासना होताना दिसते.

**संदर्भ :–**

1. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे अंत: प्रवाह,' गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ. २००८. पृ. क्र. ९३
2. तत्रैव, पृ. क्र. ९३
3. उनि, मांडे प्रभाकर, पृ. क्र. ९२
4. उनि, गारे गोविंद, पृ. क्र. दोन शब्द, मनोगत.
5. उनि, गारे गोविंद, पृ. क्र. २
6. उनि, गारे गोविंद, पृ. क्र. ९
7. उनि, गारे गोविंद, पृ. क्र. १५
8. संकलन जाधव मारुती सुकऱ्या, मु. कोंडाण, पो. जामखिड, ता, जि. पालघर
9. संकलन वायडा बाबू नारायण, मु.पो. करलगाव, ता, वाडा, जि. पालघर
10. संकलन भोईर रविता बाळू, मु. गोराड, पो. केलठण, ता. वाडा, जि. पालघर
11. संकलन काचरे शेवंता बाबू, मु. गोराड, पो. केलठण, ता. वाडा, जि. पालघर
12. संकलन डवला सदू नथू, मु. धुकटण, पो. गोवाडे, ता, जि. पालघर
13. तत्रैव
14. संकलन सांबरे जनार्दन जानू, मु.पो. करलगाव, ता, वाडा, जि. पालघर
15. उनि, गारे गोविंद, पृ. क्र. ३३